
# विधानसभा निवडणुकीत सिंधी भाषिकांमध्येच मुकाबला!

## सिंधी समाजाचा राजकीय इतिहास व वारसा ठरवणारी स्पर्धा







**नवनीत बऱ्हाटे/उल्हासनगर**

उल्हासनगर विधानसभा मतदारसंघ हा महाराष्ट्रातील एकमेव असा मतदारसंघ आहे, जिथे सर्वाधिक सिंधी भाषिकांची संख्या आहे. भारताच्या फाळणीपूर्वी ही एक लष्करी छावणी होती, परंतु फाळणीनंतर केंद्र सरकारने या छावणीचे रूपांतर निर्वासित छावणीत केले. सिंधी समाजाने, औद्योगिक दृष्टिकोनातून आणि समर्पणाने शून्यातून हे शहर एक औद्योगिक महानगर झाले आहे. सिंधी समाजाने आपल्या मेहनतीच्या जोरावर या छावणीचे रूपांतर एका औद्योगिक आणि आर्थिकदृष्ट्या सशक्त नगरीत केले. त्याचबरोबर सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातही आपली ठसा उमटवला. आजही या मतदारसंघात राजकीय पातळीवर सिंधी समाजाचे वर्चस्व दिसून येते, कारण स्थापनेपासून आतापर्यंत येथे फक्त सिंधी समाजाचे आमदारच निवडून आले आहेत.

उल्हासनगरच्या विधानसभा मतदारसंघाच्या स्थापनेपासून आतापर्यंत केवळ सिंधी समाजाचेच उमेदवार निवडून आले आहेत. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपूर्वी १९५२ च्या निवडणुकीत नेवंदराम गुरबानी आणि १९५७ मध्ये पराचाराम विद्यार्थी हे पहिल्यांदा आमदार म्हणून निवडून आले होते. राज्याच्या स्थापनेनंतर पराचाराम विद्यार्थी यांनी पुन्हा एकदा विजय मिळवला. त्यानंतर, सन्मुख इसरानी यांनी दोनदा, शीतलदास हरचंदानी यांनी तीनदा, पप्पू कलानी यांनी तीनदा, ज्योती कलानी यांनी एकदा आणि कुमार आयलानी यांनी दोनदा विजय मिळवून आमदार पदावर हक्क मिळवला. आज सुद्धा विद्यमान आमदार म्हणून भाजपचे कुमार आयलानी हे पद सांभाळत आहेत.

यंदाच्या निवडणुकीत २० तारखेला होणाऱ्या मतदानात १९ उमेदवार रिंगणात आहेत. विविध जाती धर्माचे उमेदवार रिंगणात उतरले असले तरी नेहमीप्रमाणे मुख्य लढत सिंधी भाषिक उमेदवारांमध्येच होणार, असेच स्पष्ट चित्र दिसत आहे. यंदा भाजप-शिवसेना-रिपाइं महायुतीने विद्यमान भाजप आमदार कुमार आयलानी यांना पुन्हा उमेदवारी दिली आहे, तर राष्ट्रवादीचे माजी आमदार पप्पू कलानी यांचे पुत्र ओमी कलानी यांना महाविकास आघाडीने तिकीट दिले आहे. कुमार आयलानी हे विद्यमान आमदार म्हणून लोकांमध्ये आपले स्थान मजबूत करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. तर दुसरीकडे ओमी कलानी यांच्यासाठी ही निवडणूक मोठे आव्हान आहे. आपल्या वडिलांचा राजकीय वारसा पुढे नेण्याचा आणि उल्हासनगरच्या विकासासाठी योगदान देण्याचा त्यांचा मानस आहे. यावेळी सिंधी समाजाच्या हक्काचे प्रतिनिधित्व कोण साधणार, हे पाहणे अत्यंत औत्सुक्याचे ठरणार आहे.

### प्रमुख उमेदवारांबरोबर बंडखोर मैदानात

या प्रमुख लढतीबरोबरच राष्ट्रवादीचे अजित पवार गटाचे बंडखोर भरत गंगोत्री, वंचित बहुजन आघाडीचे संजय गुप्ता आणि मनसेचे भगवान भालेराव हे देखील संपूर्ण ताकदीने निवडणुकीच्या मैदानात उतरले आहेत. या उमेदवारांनी आपल्या समर्थकांसह मोठ्या प्रचार मोहिमा चालवल्या आहेत. उल्हासनगरच्या निवडणुकीत सिंधी समाजाचे वर्चस्व कायम राहणार की बदलाच्या नावाने कोणी नव्याने विजयी होणार, यावर सर्वांचे लक्ष आहे. या विधानसभा निवडणुकीचा निकाल कोणताही असो, परंतु यावेळी हा निकाल उल्हासनगरच्या राजकीय समीकरणांना नव्या दिशेने नेऊ शकतो.

### सिंधी समाजाच्या प्रतिनिधित्वासाठी प्रयत्न

उल्हासनगरच्या मतदारसंघात सिंधी समाजाच्या प्रतिनिधित्वासाठी प्रयत्नशील असलेले उमेदवार एकमेकांना टक्कर देत आहेत, तर अन्य समाजातील उमेदवारांनी देखील आपले अस्तित्व दाखवण्यासाठी संधी मिळवण्याचा प्रयत्न केला आहे. शहरातील नागरिकांनी मतदानासाठी सज्ज व्हावे, अशी अपेक्षा सर्व उमेदवारांकडून केली जात आहे. उल्हासनगरच्या या विधानसभा निवडणुकीत जे उमेदवार विजयी होतील, ते शहराच्या भविष्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावतील. यामुळे, कोणता उमेदवार विजयी होणार, हे पाहण्यासाठी संपूर्ण शहर उत्सुकतेने प्रतीक्षेत आहे.

## लग्नाचे आमिष दाखवून अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**मोखाडा :** मोखाडा तालुक्यातील दुधगाव येथील अवघ्या १३ वर्षाच्या अल्पवयीन मुलीला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर अत्याचार केल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी पीडित मुलीच्या आईने मोखाडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून आरोपी हरेष काशीनाथ ठोमरे याला पोलिसांनी पोक्सो कायद्यांतर्गत अटक केली आहे. त्याला भिवंडी येथील प्रथमवर्ग न्यायालयात हजर केले असता ३ दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

मोखाडा पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हरेष काशीनाथ ठोमरे (२४) याने येथील एका १३ वर्षीय अल्पवयीन मुलीला लग्नाचे आमिष दाखवून आम्ले गावानजीकच्या जंगलात नेऊन तिच्यावर शारीरिक अत्याचार करण्यात आले. ही घटना मुलीच्या घरच्यांना समजली असता सदर पीडित मुलीच्या आईने मोखाडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवरून मोखाडा पोलिसांनी हरेष विरोधात पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. याप्रकरणी फरार झालेल्या आरोपी हरेषला पोलिसांनी अटक केली आहे.

# भिवंडीच्या राजकीय वैराला फुटले पेव

- अंतर्गत कुरघोडीतून कोणाचे बंड, तर कोणाची हकालपट्टी
- नवीन चेहऱ्यांमुळे होणार चुरशीची लढत

**सुमित घरत/ भिवंडी**

नुकत्याच पार पडलेल्या भिवंडी लोकसभा २०२४ च्या निवडणुकीत महायुती आणि मविआमधील घटक पक्षातील अंतर्गत कुरघोडीसह राजकीय वैर समोर आले होते. याच पार्श्वभूमीवर २० नोव्हेंबर रोजी होऊ घातलेल्या विधानसभेच्या निवडणुकीच्या तोंडावर भिवंडीच्या राजकीय वैराला पेव फुटण्यास सुरुवात झाली आहे.

भिवंडी विधानसभा क्षेत्रातील पूर्व,पश्चिम आणि ग्रामीण या तिन्ही मतदारसंघात बंडाचे वारे सुसाट वाहताना दिसून येत आहे. यामुळे उबाठा पक्षश्रेष्ठींकडून माजी आमदार रुपेश म्हात्रे यांच्यावर हकालपट्टीची कारवाईही केली गेली. तसेच भाजप आणि काँग्रेस घटक पक्षातून अशाच प्रकारच्या कारवाईची शक्यता नाकारता येत नाही. भिवंडी विधानसभा क्षेत्र पूर्वमध्ये शिवसेना उबाठा गटाचे माजी आमदार रुपेश म्हात्रे यांनी उमेदवारी न मिळाल्याने बंड पुकारत अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला होता. त्यानंतर जोरदार शक्तिप्रदर्शन करून पक्षप्रमुख उद्धव ठाकरे मुलगा आदित्य ठाकरे यांच्या विजयासाठी भिवंडीच्या शिवसेना (उबाठा) गटाचा बळी देत असल्याचा आरोप रुपेश म्हात्रे यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना केला होता. तर ४ नोव्हेंबर रोजी म्हात्रेंनी पक्षश्रेष्ठीच्या आदेशानुसार उमेदवारी अर्ज मागे घेतला होता.

परंतु ५ नोव्हेंबर रोजी उबाठा पक्षश्रेष्ठींनी म्हात्रेंवर कडक कारवाई करून त्यांची पक्षातून हकालपट्टी केली आहे. अशाने येत्या २० तारखेच्या निवडणुकीत भिवंडी पूर्वेत माविआच्या अडचणीत वाढ होऊन विरोधकांना याचा किती फायदा होतो,हे येणारा काळच ठरवणार आहे. त्यातच भिवंडी पश्चिम विधानसभा क्षेत्रात अपक्ष उमेदवार विलास आर. पाटील यांचा बंड ताजा असतानाच मविआचे विद्यमान खासदार सुरेश उर्फ बाळ्या (मामा) म्हात्रे यांनी मंगळवारी रात्री सपाचे उमेदवार रियाज आजमी यांच्या निवडणूक कार्यालयाचे उद्घाटन केल्याने याबाबत आश्चर्य व्यक्त केले जात असून भिवंडी मविआ पश्चिम विधानसभा क्षेत्रात खळबळ माजली असून शहरात हा चर्चेचा विषय ठरला आहे. तर याचा फटका काँग्रेसचे उमेदवार दयानंद चोरघे यांना बसण्याची चिन्हे नाकारता येत नाहीत.

### भिवंडी ग्रामीणमधील राजकारण तापले

ग्रामीणमध्ये भाजपच्या स्नेहा पाटीलही महायुतीतून बंड पुकारून निवडणुकीला सामोरे जात आहेत. त्यामुळे विद्यमान आमदार शांताराम मोरे यांच्या अडचणीत वाढ झाल्याचे बोलले जात असून स्नेहा पाटील यांच्यावर निवडणुकीनंतर पक्षश्रेष्ठीकडून कारवाई केली जाणार असल्याचे संकेत दिले गेले आहेत. तर मंगळवारी रात्री अपक्ष उमेदवार स्नेहा पाटील यांच्या काल्हेर येथील गोदामांवर एमएमआरडीएने पाटील यांना कुठल्याही प्रकारची नोटीस न बजावताच अचानकपणे तोडक कारवाई केल्याने भिवंडी ग्रामीणमधील राजकारण तापल्याचे समोर आले आहे. दरम्यान आगामी भिवंडी विधानसभा निवडणुकीतील पूर्व,पश्चिम आणि ग्रामीण मधील लढती बंडखोरी,राजकीय वैर, अंतर्गत कुरघोडी, जातीय-धार्मिक समीकरणे आणि नवीन चेहरे यामुळे चुरशीच्या होणार, असे बोलले तरी व्यर्थ ठरू नये.

GE VERNOVA

## जीई पॉवर इंडिया लिमिटेड

**सीआयएन :** एल७४१४०एमएच१९९२पीएलसी०६८३७९, **नोंद. कार्यालय :** रेगस मॅग्नम बिझनेस सेंटर्स ११ वा मजला, प्लॅटिना, जी ब्लॉक, प्लॉट क्र. सी-५९, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे पूर्व, मुंबई, महाराष्ट्र, भारत-४०० ०५१. **टेलि क्र.:** +९१ २२ ६८८४१७४१
**वेबसाईट :** www.gevernova.com/regions/in/ge-power-india-limited, **इमेल आयडी:** in.investor-relations@ge.com

**३० सप्टेंबर, २०२४ रोजी संपलेली तिमाही आणि सहा महिन्यांसाठी अलिप्त आणि एकत्रित अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षांच्या विवरणाचा उतारा**

(रु. दशलक्ष, प्रती शेअर डेटा सोडून)

| अ. क्र. | तपशील | संपलेली तिमाही 30.09.2024 | संपलेले सहा महिने 30.09.2024 | संपलेली तिमाही 30.09.2023 | संपलेली तिमाही 30.09.2024 | संपलेले सहा महिने 30.09.2024 | संपलेली तिमाही 30.09.2023 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अलिप्त | | | एकत्रित | | |
| १. | चालू प्रवर्तनातून एकूण उत्पन्न | 2,444.5 | 4,973.2 | 2,508.0 | 2,444.5 | 4,973.2 | 2,508.0 |
| २. | कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (कर, अपवादात्मक आणि/किंवा अनन्यसाधारण बाबींपूर्व) | 91.4 | -158.8 | -359.4 | 100.2 | -138.1 | -358.0 |
| ३. | करपूर्व कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा अनन्यसाधारण बाबींनंतर) | 660.0 | 552.7 | -619.9 | 668.7 | 573.4 | -618.5 |
| ४. | करपश्चात कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा अनन्यसाधारण बाबींनंतर) | 660.0 | 552.7 | -619.9 | 668.7 | 573.4 | -618.5 |
| ५. | कालावधीकरिता एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (ज्यात कालावधीकरिता (करपश्चात) नफा /(तोटा) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करपश्चात) धरुन) | 656.4 | 545.6 | -626.4 | 665.1 | 566.3 | -625.0 |
| ६. | समभाग भांडवल | 672.3 | 672.3 | 672.3 | 672.3 | 672.3 | 672.3 |
| ७. | पुनर्मूल्यांकन राखीव वगळून राखीव* | - | - | - | - | - | - |
| ८. | प्रति शेअर प्राप्ती (प्रत्येकी रु. १०/-) (अखंडीत व खंडीत कामकाजासाठी) | | | | | | |
| | मुलभूत : | 9.82 | 8.22 | -9.22 | 9.95 | 8.53 | -9.20 |
| | सौम्यीकृत : | 9.82 | 8.22 | -9.22 | 9.95 | 8.53 | -9.20 |

* दिनांक ३१ मार्च, २०२४ रोजीस प्रमाणे कालावधीकरिता पुनर्मूल्यांकन राखीव वगळून राखीव रु. -९८.८ दशलक्ष होत्या.

**टिपा :**

ए) सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँन्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ३३ अंतर्गत स्टॉक एक्सचेंजेसमध्ये सादर केलेल्या ३० सप्टेंबर, २०२४ रोजी संपलेली तिमाही आणि सहा महिन्यांसाठी वित्तीय निष्कर्षांच्या तपशीलवार विवरणाचा उतारा वर देण्यात आला आहे. ३० सप्टेंबर, २०२४ रोजी संपलेली तिमाही आणि सहा महिन्यांसाठी वित्तीय निष्कर्षांचे संपूर्ण विवरण स्टॉक एक्सचेंजेसची वेबसाईट (www.bseindia.com/ www.nseindia.com) आणि कंपनी वेबसाईट (www.ge.com/in/ge-power-india-limited) येथे उपलब्ध आहे.

बी) वरील निष्कर्ष लेखा परिक्षण समितीद्वारे पुनर्विलोकित करण्यात आले आहेत आणि संचालक मंडळाद्वारे ०६ नोव्हेंबर, २०२४ रोजी झालेल्या सभेत संचालक मंडळाद्वारे मंजूर करण्यात आले. ३० सप्टेंबर, २०२४ रोजी संपलेली चालू तिमाही आणि सहा महिने करिताचे निष्कर्ष कंपनीच्या सांविधिक लेखापरीक्षकांद्वारे मर्यादित पुनर्विलोकन केले आहे.

सी) अपवादात्मक आणि/किंवा अनन्यसाधारण बाबी येथे प्रयोज्य इंड-एएस रुल्स/एएस रुल्स अनुसार नफा आणि तोट्यांच्या विवरणपत्रात समायोजित करण्यात आल्या आहेत.

**संचालक मंडळाच्या वतीने आणि साठी**
**(पुनीत भाटला)**
**व्यवस्थापकीय संचालक**
डीआयएन : ०९५३६२३६

**ठिकाण : नॉयडा**
**दिनांक : ६ नोव्हेंबर, २०२४**

## वार्डविझार्ड इनोव्हेशन्स अँन्ड मोबिलिटी लिमिटेड

सीआयएन : एल३५१००एमएच१९८२पीएलसी२६४०४२
**नोंद. कार्यालय:** ऑफिस नं. ४६०४, ४६ वा मजला, कोहिनुर स्क्वेअर, केळकर मार्ग, शिवाजी पार्क, दादर (पश्चिम), आर.जी. गडकरी चौक जवळ, मुंबई - ४०००२८, महाराष्ट्र भारत
**कॉर्पो. ऑफिस:** सर्व्हे २६/२, पुजा फार्म समोर, सयाजीपुरा, आज्वा रोड, वडोदरा - ३९००१९, गुजरात, भारत.
ईमेल: compliance@wardwizard.in, वेबसाईट: www.wardwizard.in / दूर.: +९१ ६३५८८४९३८५

**३० सप्टेंबर, २०२४ रोजी संपलेल्या दुसरी तिमाही आणि अर्ध वर्षासाठी एकत्रित आणि अलिप्त अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षांचा उतारा**

(रु. लाखांत)

| अ. क्र. | तपशील | एकत्रित: संपलेली तिमाही ३०.०९.२०२४ अलेखापरिक्षित | एकत्रित: संपलेली तिमाही ३०.०६.२०२४ अलेखापरिक्षित | एकत्रित: संपलेली तिमाही ३०.०९.२०२३ अलेखापरिक्षित | एकत्रित: संपलेले अर्ध वर्ष ३०.०९.२०२४ अलेखापरिक्षित | एकत्रित: संपलेले अर्ध वर्ष ३०.०९.२०२३ अलेखापरिक्षित | एकत्रित: संपलेले वर्ष ३१.०३.२०२४ लेखापरिक्षित | अलिप्त: संपलेली तिमाही ३०.०९.२०२४ अलेखापरिक्षित | अलिप्त: संपलेली तिमाही ३०.०६.२०२४ अलेखापरिक्षित | अलिप्त: संपलेली तिमाही ३०.०९.२०२३- अलेखापरिक्षित | अलिप्त: संपलेले अर्ध वर्ष ३०.०९.२०२४ अलेखापरिक्षित | अलिप्त: संपलेले अर्ध वर्ष ३०.०९.२०२३ अलेखापरिक्षित | अलिप्त: संपलेले वर्ष ३१.०३.२०२४ लेखापरिक्षित |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | प्रवर्तनातून एकूण उत्पन्न | ५८१८.३० | ५१४१.३६ | ४९१५.०१ | १०९५९.६६ | ८७०१.९३ | ३२१४१.९७ | ५८१८.३० | ४८९२.४७ | ४५१०.९९ | १०७१०.७७ | ८२९७.९० | ३१७३१.४३ |
| | इतर उत्पन्न | १३.९१ | २.९५ | १.४५ | १६.८५ | २.७९ | २१.०१ | १३.९८ | ४.२९ | २.३४ | १८.२८ | ४.७४ | २५.७६ |
| | एकूण उत्पन्न | ५८३२.२० | ५१४४.३१ | ४९१६.४७ | १०९७६.५१ | ८७०४.७२ | ३२१६२.९८ | ५८३२.२८ | ४८९६.७६ | ४५१३.३३ | १०७२९.०४ | ८३०२.६४ | ३१७५७.१९ |
| २. | कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (कर, अपवादात्मक आणि/किंवा अनन्यसाधारण बाबींपूर्वी#) | (६९५.७२) | ३१२.४३ | ३४०.४९ | (३८३.२९) | ५५७.१५ | १९९१.८० | (६७४.५९) | ३२८.३३ | ३२७.३४ | (३४६.२६) | ५६९.९५ | २०६३.४६ |
| ३. | कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा अनन्यसाधारण बाबींनंतर#) | (६९५.७२) | ३१२.४३ | ३४०.४९ | (३८३.२९) | ५५७.१५ | १९९१.८० | (६७४.५९) | ३२८.३३ | ३२७.३४ | (३४६.२६) | ५६९.९५ | २०६३.४६ |
| ४. | कालावधीसाठी करोत्तर निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक आणि/ किंवा अनन्यसाधारण बाबींनंतर#) | (६२१.५९) | २३०.२३ | २५४.८९ | (३९१.३६) | ४११.२६ | १३४३.५१ | (५९५.८३) | २४१.५० | २४१.७४ | (३५४.३३) | ४१६.८५ | १४१५.१६ |
| ५. | कालावधीसाठी एकूण सर्वसामावेशक उत्पन्न (कालावधीसाठी नफा/ (तोटा) (करोत्तर) आणि इतर सर्वसामावेशक उत्पन्न (करोत्तर) धरून) | (६२०.९३) | २३१.६० | २५८.२० | (३८९.३३) | ४१२.९६ | १३४४.११ | (५९५.१७) | २४२.८७ | २४५.०५ | (३५२.३०) | ४१८.५४ | १४१५.७६ |
| ६. | समभाग भांडवल (शेअर्स ची संख्या) | २६०६.९४ | २६०६.९४ | २६०६.९४ | २६०६.९४ | २६०६.९४ | २६०६.९४ | २६०६.९४ | २६०६.९४ | २६०६.९४ | २६०६.९४ | २६०६.९४ | २६०६.९४ |
| ७. | मागील वर्षाच्या लेखापरिक्षित ताळेबंदात दाखविल्याप्रमाणे राखीव (पूनर्मूल्यांकित राखीव वगळून) | - | - | - | - | - | ७५१९.३५ | - | - | - | - | - | ७६५२.५३ |
| ८. | प्रति भाग प्राप्ती (प्रत्येकी रु. १/-चे) (अखंडित आणि खंडित कामकाजासाठी) | | | | | | | | | | | | |
| | मुलभूत : | (०.२४) | ०.०९ | ०.१० | (०.१५) | ०.१६ | ०.५२ | (०.२३) | ०.०९ | ०.०९ | (०.१४) | ०.१६ | ०.५४ |
| | सौम्यिकृत : | (०.२४) | ०.०९ | ०.१० | (०.१५) | ०.१६ | ०.५२ | (०.२३) | ०.०९ | ०.०९ | (०.१४) | ०.१६ | ०.५४ |

**टीपा :**

१. ३० सप्टेंबर, २०२४ रोजी संपलेल्या दुसऱ्या तिमाही आणि अर्ध वर्षासाठी अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षांचे विवरण लेखापरीक्षण समितीने पुनर्विलोकित केले आणि संचालक मंडळाने **०६.११.२०२४** रोजी झालेल्या त्यांच्या बैठकीत मंजुर केले.
२. हे वित्तीय निष्कर्ष कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम १३३ अंतर्गत विहित इंडियन अकाऊंटींग स्टँडर्ड (इंड-एएस) सह एकत्रितपणे वाचता कंपनीज (इंडियन अकाऊंटींग स्टँटर्डस) रुल्स, २०१५ (सुधारित) आणि सुधारित सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) (लिस्टींग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ३३ च्या आवश्यकतेनुसार बनवले आहेत.
३. चालू वर्षाच्या सादरीकरणाशी सुसंगत होण्यासाठी आवश्यकतेनुसार मागील कालावधीची आकडेवारी पुनर्गठीत/पुनर्वर्गीकृत केली आहे.
४. सेबी (लिस्टींग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ३३ प्रमाणे कंपनीच्या वैधानिक लेखापरीक्षकांनी वरील निष्कर्षांचा 'मर्यादित पुनर्विलोकन अहवाल' केला आहे. लेखापरीक्षण अहवालांत कोणत्याही दुरुस्त्या सुचवलेल्या नाहीत.
५. 'प्रवर्तनीय विभागां'वरील इंड एएस-१०८ मध्ये दिलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार कंपनी वर्षामध्ये इलेक्ट्रीक मोबिलिटी वेहीकल्स व त्याच्याशी संबंधित कामकाज ह्या एकाच विभागांत कार्यरत आहे.
६. वरील वित्तीय निष्कर्ष कंपनीची वेबसाईट http:www.wardwizard.in आणि बीएसई लिमिटेड ची वेबसाईट वर देखील उपलब्ध आहेत.
७. चालू तिमाही मध्ये एकूण तीन गुंतवणूकदार तक्रार प्राप्त झाल्या, ३० सप्टेबर, २०२४ रोजी प्रमाणे यापैकी दोन तक्रारींचे निराकरण झाली नाही.
८. वरील तिमाहीत एकत्रित वित्तीय निष्कर्षांमध्ये फक्त एकच उपकंपनी-विदेशी 'वार्डविझार्ड ग्लोबल प्रा. लि.,' (संपूर्ण मालकीची उपकंपनी) चे वित्तीय निष्कर्ष समाविष्ट आहेत. ३०.०९.२०२४ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी एकत्रिकरणानंतर रु. २१,१२,७२२.०४ (रक्कम रु. त) या रकमेचा एकूण तोटा झाला.

संचालक मंडळाच्या वतीने आणि साठी
**वार्डविझार्ड इनोव्हेशन्स अँन्ड मोबिलिटी लिमिटेड** साठी
सही/-
यतिन संजय गुप्ते
व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन : ०७२६११५०

ठिकाण : वडोदरा
दिनांक : ०६.११.२०२४

TATA

**TATA STEEL LIMITED**

**Registered Office:** Bombay House, 24, Homi Mody Street, Fort, Mumbai - 400 001 India
Tel.: 91 22 6665 8282 • Fax No.: 91 22 6665 7724 • Email: cosec@tatasteel.com • Website: www.tatasteel.com
CIN: L27100MH1907PLC000260

**सूचना**

**३० सप्टेंबर, २०२४ रोजी संपलेल्या तिमाही/सहा महिन्यांसाठी अलिप्त वित्तीय निष्कर्षांचा उतारा**

**₹ कोटी**

| तपशील | ३०.०९.२०२४ रोजी संपलेली तिमाही | ३०.०६.२०२४ रोजी संपलेली तिमाही | ३०.०९.२०२३ रोजी संपलेली तिमाही | ३०.०९.२०२४ रोजी संपलेले सहा महिने | ३०.०९.२०२३ रोजी संपलेले सहा महिने | ३१.०३.२०२४ रोजी संपलेले आर्थिक वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| | लेखापरिक्षित | लेखापरिक्षित | लेखापरिक्षित | लेखापरिक्षित | लेखापरिक्षित | लेखापरिक्षित |
| प्रवर्तनातून एकूण महसूल | ३२,३९९.४८ | ३२,९५७.८९ | ३४,१९७.७६ | ६५,३५७.३७ | ६९,७०५.६७ | १,४०,९३२.६५ |
| कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (कर आणि अपवादात्मक बाबींपूर्वी) | ४,७७२.०२ | ४,७०१.८५ | ५,१२८.७६ | ९,४७३.८७ | १०,८१८.४० | २२,९९२.७३ |
| कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक बाबींनंतर) | ४,७८५.८४ | ४,४६५.२८ | (७,८६४.०१) | ९,२५१.१२ | (२,१८५.६१) | ९,३५७.०५ |
| कालावधीसाठी करोत्तर निव्वळ नफा/(तोटा) | ३,५९०.९९ | ३,३३०.९५ | (८,४९०.९६) | ६,९२१.९४ | (३,२७५.५८) | ५,५१४.१९ |
| कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न [कालावधीसाठी नफा/(तोटा) (करोत्तर) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करोत्तर) धरून] | ३,५९८.७८ | ३,४८४.८६ | (८,२९७.९९) | ७,०८३.६४ | (२,९२७.०५) | ६,२०३.७३ |
| भरणा झालेले समभाग भांडवल [दर्शनी मूल्य ₹ १ प्रति भाग] | १,२४८.६० | १,२४८.६० | १,२२२.४० | १,२४८.६० | १,२२२.४० | १,२४८.६० |
| पुनर्मुल्यांकित राखीव वगळून राखीव | | | | | | १,३८,३८०.१७ |
| सिक्युरिटीज प्रिमियम रिझर्व्ह | ३१,२९०.२४ | ३१,२९०.२४ | ३१,२९०.२४ | ३१,२९०.२४ | ३१,२९०.२४ | ३१,२९०.२४ |
| नेट वर्थ | १,३९,०३१.८७ | १,३९,९२५.४९ | १,२७,३३९.८८ | १,३९,०३१.८७ | १,२७,३३९.८८ | १,३६,४४०.८३ |
| भरणा झालेले कर्ज भांडवल | १२,८२४.६९ | १२,८२३.८९ | १०,६२५.८८ | १२,८२४.६९ | १०,६२५.८८ | १२,८२३.१० |
| निव्वळ डेब्ट इक्विटी रेशो | ०.३७ | ०.२७ | ०.३० | ०.३७ | ०.३० | ०.२७ |
| प्रति समभाग प्राप्ती | | | | | | |
| प्रत्येकी ₹ १ ची मूलभूत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत (अपवादात्मक बाबीनंतर) | २.८८ | २.६७ | (६.८०) | ५.५४ | (२.६२) | ४.४२ |
| प्रत्येकी ₹ १ ची सौम्यिकृत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत (अपवादात्मक बाबीनंतर) | २.८८ | २.६७ | (६.८०) | ५.५४ | (२.६२) | ४.४२ |
| डिबेंचर विमोचन राखीव | १,३२८.७५ | १,३२८.७५ | १,३२८.७५ | १,३२८.७५ | १,३२८.७५ | १,३२८.७५ |
| डेब्ट सर्व्हिस कव्हरेज रेशो | ३.५१ | ३.१३ | २.५४ | ३.३१ | १.५३ | २.५६ |
| इंटरेस्ट सर्व्हिस कव्हरेज रेशो | १७.४१ | ८.७१ | ८.२० | ११.५४ | ९.३३ | १०.३३ |

**३० सप्टेंबर, २०२४ रोजी संपलेल्या तिमाही/सही महिन्यांसाठी एकत्रित वित्तीय निष्कर्षांचा उतारा**

**₹ कोटी**

| तपशील | ३०.०९.२०२४ रोजी संपलेली तिमाही | ३०.०६.२०२४ रोजी संपलेली तिमाही | ३०.०९.२०२३ रोजी संपलेली तिमाही | ३०.०९.२०२४ रोजी संपलेले सहा महिने | ३०.०९.२०२३ रोजी संपलेले सहा महिने | ३१.०३.२०२४ रोजी संपलेले आर्थिक वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| | अलेखापरिक्षित | अलेखापरिक्षित | अलेखापरिक्षित | अलेखापरिक्षित | अलेखापरिक्षित | लेखापरिक्षित |
| प्रवर्तनातून एकूण महसूल | ५३,९०४.७१ | ५४,७७१.३९ | ५५,६८१.९३ | १,०८,६७६.१० | १,१५,१७१.५९ | २,२९,१७०.७८ |
| कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (कर आणि अपवादात्मक बाबींपूर्वी) | २,१४६.२४ | २,७३४.७५ | १५९.७१ | ४,८८०.९९ | २,००१.६६ | ६,६६७.०४ |
| कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक बाबींनंतर) | २,१६४.३३ | २,३७६.८२ | (६,७३९.१९) | ४,५४१.१५ | (४,८८३.८२) | (१,१४७.०४) |
| कालावधीसाठी करोत्तर निव्वळ नफा/(तोटा) | ७५८.८४ | ९१८.५७ | (६,५११.१६) | १,६७७.४१ | (५,९८६.३१) | (४,९०९.६१) |
| कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न किालावधीसाठी नफा/ (तोटा) (करोत्तर) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करोत्तर) धरून | १,४९१.२४ | १,०९४.५० | (७,२८५.३५) | २,५८५.७४ | (९,९३३.२१) | (८,१३७.५१) |
| भरणा झालेले समभाग भांडवल [दर्शनी मूल्य ₹ १ प्रति भाग] | १,२४७.४४ | १,२४७.४४ | १,२२१.२४ | १,२४७.४४ | १,२२१.२४ | १,२४७.४४ |
| राखीव (पुनर्मुल्यांकित राखीव वगळून) आणि अनियंत्रक व्याज | | | | | | ९१,१८५.३० |
| नेट वर्थ | ८६,७४७.८७ | ८९,८१५.१० | ८६,५७७.५३ | ८६,७४७.८७ | ८६,५७७.५३ | ८८,६२३.८२ |
| निव्वळ डेब्ट इक्विटी रेशो | ०.९७ | ०.८८ | ०.७९ | ०.९७ | ०.७९ | ०.७८ |
| प्रति समभाग प्राप्ती: | | | | | | |
| प्रत्येकी य १ ची मूलभूत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)- रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर) | ०.६७ | ०.७७ | (५.०७) | १.४४ | (४.५६) | (३.६२) |
| प्रत्येकी य १ ची सौम्यिकृत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)- रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर) | ०.६७ | ०.७७ | (५.०७) | १.४४ | (४.५६) | (३.६२) |
| डिबेंचर विमोचन राखीव | १,३२८.७५ | १,३२८.७५ | १,३२८.७५ | १,३२८.७५ | १,३२८.७५ | १,३२८.७५ |
| डेब्ट सर्व्हिस कव्हरेज रेशो | ०.२९ | १.६४ | ०.२१ | ०.५४ | ०.३२ | ०.६८ |
| इंटरेस्ट सर्व्हिस कव्हरेज रेशो | ३.४० | ३.१९ | १.१२ | ३.२८ | १.९७ | २.४७ |

**टीप :**
सेबी (लिस्टिंग अँड अदर डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ३३ आणि रेग्युलेशन ५२ अंतर्गत स्टॉक एक्स्चेंजेसमध्ये सादर केलेल्या ३० सप्टेंबर, २०२४ रोजी संपलेल्या तिमाही/सहा महिन्यांसाठी अलिप्त आणि एकत्रित वित्तीय निष्कर्षांच्या तपशीलवार विवरणाचा वरील एक उतारा आहे. ३० सप्टेंबर, २०२४ रोजी संपलेल्या तिमाही/सहा महिन्यांसाठी अलिप्त आणि एकत्रित निष्कर्षांचे संपूर्ण विवरण स्टॉक एक्स्चेंजेसच्या वेबसाईटस् (www.nseindia.com / www.bseindia.com) आणि कंपनीची वेबसाईट (www.tatasteel.com) वर उपलब्ध आहे.

**टी व्ही नरेंद्रन**
मुख्य कार्यकारी अधिकारी आणि
व्यवस्थापकीय संचालक
मुंबई : ६ नोव्हेंबर, २०२४

**कौशिक चॅटर्जी**
कार्यकारी संचालक आणि
मुख्य वित्तीय अधिकारी

TATA STEEL

# पालिका विकास आराखडा अंमलबजावणीच्या गतीवर प्रश्नचिन्ह

## महापालिका आयुक्तांचे अभियंत्यांना खडेबोल

लोकसत्ता प्रतिनिधी



**मुंबई :** मुंबईचा २०३४ पर्यंतचा विकास आराखडा २०१६ मध्ये तयार केला गेला. मात्र, या विकास आराखड्याच्या अंमलबजावणीचे काम अत्यंत संथगतीने सुरू आहे, असे सुनावून मुंबईच्या विकास आराखड्यावर आणि त्याच्या अंमलबजावणीवर महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी गुरुवारी प्रश्न उपस्थित केला.

केवळ बहुमजली इमारती किंवा भव्य रस्ते म्हणजेच विकास नव्हे, तर नागरिकांना गुणवत्तापूर्ण मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देणे आणि शहर त्यांच्यासाठी राहण्यायोग्य बनवणे फार महत्त्वाचे असते. केवळ विकास आराखडा तयार करून विकास नियोजन अभियंत्यांची जबाबदारी संपत नाही. त्याची अंमलबजावणी होऊन शहराला राहण्यायोग्य बनविणे हीसुद्धा त्यांची जबाबदारी आहे, अशा शब्दात महापालिका आयुक्तांनी यावेळी विकास नियोजन विभागाच्या अभियंत्यांची कानउघाडणीही केली. महानगरपालिकेच्या विकास नियोजन विभागात कार्यरत प्रत्येक अधिकारी व अभियंत्यांनी सक्रिय होऊन अत्यंत सजगतेने कार्य करावे. विकास आराखडा तयार करताना सुविधांच्या उपलब्धतेसह नागरिकांच्या मागण्यांचाही विचार करायला हवा, असेही गगराणी यांनी सुनावले.

महापालिका आयुक्त तसेच प्रशासक भूषण गगराणी यांनी विकास नियोजन विभागाच्या कामकाजाचा महानगरपालिका मुख्यालयात गुरुवारी आढावा घेतला. त्यावेळी, आयुक्तांनी मुंबईच्या विकास आराखड्यावर आणि त्याच्या अंमलबजावणीवर प्रश्न उपस्थित केला. या आढावा बैठकीला माजी सनदी अधिकारी, तसेच पालिकेच्या सेंटर फॉर कपॅसिटी बिल्डिंग अँड रिसर्चचे महासंचालक डॉ. रमानाथ झा, महानगरपालिका सहआयुक्त चंद्रशेखर चोरे, प्रमुख अभियंता (विकास नियोजन) सुनील राठोड यांच्यासह संबंधित अधिकारी व अभियंता उपस्थित होते.

### शहर राहण्यायोग्य करा!

**शहराचा विकास आराखडा तयार इतकेच महत्त्वाचे नसते तर त्याची योग्यप्रकारे अंमलबजावणी होणेही गरजेचे असते. विकास आराखडा ज्या कारणांसाठी तयार केला आहे, त्यावर अंमलबजावणीही व्हायला हवी. विकास आराखडा तयार करताना आवश्यक सुविधा आणि नागरिकांच्या मागण्या यांचा विचार प्रकर्षाने केला जावा. हे शहर राहण्यायोग्य करा. प्रशासकीय विभाग (वॉर्ड) स्तरावर कार्यरत असलेल्या विकास नियोजनाशी संबंधित अभियंत्यांनी प्रत्येक विभागाला स्वतंत्र शहर गृहित धरून त्यानुसार आराखडा तयार करण्यास प्राधान्य द्यावे. विभागस्तरावरील उपलब्ध जागा, आरक्षण आदींच्या मागील दहा वर्षांमधील आकडेवारीचा अभ्यास करून पुढील नियोजन करावे. प्रत्येकाने सक्रियता दाखवून प्रत्येक विभागस्तरावर कार्य करावे व विकास आराखड्याच्या अंमलबजावणीकडे लक्ष पुरवावे, असे आवाहनही गगराणी यांनी यावेळी केले.**

# १० नोव्हेंबर रोजी शिक्षक पात्रता परीक्षा

## गैरप्रकार टाळण्यासाठी विविध उपाययोजना

लोकसत्ता प्रतिनिधी

**ठाणे :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे २०२४ मध्ये घेण्यात येणाऱ्या टीईटी परीक्षेची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली आहे. राज्यभरात १० नोव्हेंबर रोजी ही परीक्षा पार पडणार आहे. या परिक्षेसाठी ठाणे जिल्ह्यातून १० हजार १७८ जणांनी नोंदणी केली आहे. जिल्ह्यातील १५ केंद्रांवर ही परिक्षा होणार आहे. या परिक्षेत कोणताही गैरप्रकार घडू नये आणि ही परीक्षा सुरळित पार पडावी यासाठी परिक्षा केंद्रांवर पोलीस बंदोबस्तासह सीसीटिव्ही कॅमेरे लावण्यात आले आहेत, अशी माहिती ठाणे जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे यांनी दिली.

शिक्षक पदासाठी २०१३ पासून 'टीईटी' परीक्षा बंधनकारक करण्यात आली आहे. गैरप्रकारांमुळे मागील काही टीईटी परीक्षा चर्चेत राहिल्या होत्या. त्यानंतर परिषदेने या परीक्षेत अनेक बदल केले आहेत. यामध्ये परीक्षा केंद्रावर सीसीटीव्हीसह विद्यार्थ्यांची बायोमेट्रिक पद्धतीने उपस्थिती नोंदविली जाणार आहे. ठाणे जिल्ह्यात १५ केंद्रावर दोन सत्रात ही परीक्षा होणार आहे. यामध्ये सकाळच्या सत्रात पेपर-१साठी ४,७९६ परीक्षार्थी असणार आहेत. तर, दुपारच्या सत्रात पेपर-२साठी ५,४३३ परीक्षार्थी असणार आहेत.

ज्ञानराधा मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटी प्रकरण

# ईडीकडून ३३३ कोटींच्या मालमत्तेवर टाच

लोकसत्ता खास प्रतिनिधी




**मुंबई :** ज्ञानराधा मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीतील गुंतवणूक फसवणुकीप्रकरणी सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) ३३३ कोटी ८२ लाख रुपयांच्या मालमत्तेवर टाच आणली आहे. टाच आणण्यात आलेल्या मालमत्तेत मेसर्स कुटे सन्स डेअरी लिमिटेडची आणि मेसर्स कुटे सन्स फ्रेश डेअरी प्रायव्हेट लिमिटेडची सातारा व अहमदनगर येथील जमीन, इमारती, प्रकल्प आणि मशीन यांचा समावेश असल्याची माहिती गुरुवारी ईडीकडून देण्यात आली.

ईडीने दिलेल्या माहितीनुसार, ज्ञानराधा मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेडच्या वेगवेगळ्या जिल्ह्यांत ५२ पेक्षा जास्त शाखा आहेत. त्याचे व्यवस्थापन आणि नियंत्रण सुरेश ज्ञानोबा कुटे, यशवंत व्ही. कुलकर्णी आणि अन्य संबंधित करत होते. विविध ठेव योजना आणून त्यांनी १२ ते १४ टक्क्यांपर्यंत व्याज देण्याचा दावा केला. वैयक्तिक कर्ज, साधे कर्ज, पगार कर्ज, मुदत कर्ज, सुवर्ण कर्ज आणि एफडीआर कर्ज अशा विविध योजना सुरू केल्या. यातील आरोपी सुरेश कुटे आणि संबंधितांनी ज्ञानराधा मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेडच्या (डीएमसीएसएल) माध्यमातून गुंतवणूकदारांची फसवणूक करण्यासाठी अनेक गुंतवणूक योजना राबविल्या. त्यात चार लाख गुंतवणूकदारांनी गुंतवणूक केली होती.

तपासानुसार, या प्रकरणी २,४६७ कोटी ८९ लाख रुपये इतरत्र वळवण्यात आल्याचा आरोप आहे. त्यानंतर, कुटे यांच्या विरोधात फसवणुकीचे नऊ गुन्हे दाखल झाले. याप्रकरणी ईडीने आतापर्यंत १४३३ कोटी ३० लाख रुपयांच्या मालमत्तेवर टाच आणली आहे.

# 'अभाविप'च्या राष्ट्रीय अध्यक्षपदी प्रा. डॉ. राजशरण शाही

## राष्ट्रीय महामंत्रीपदी डॉ. विरेंद्र सिंह सोलंकी यांची निवड

लोकसत्ता प्रतिनिधी



**मुंबई :** अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या २०२४-२५ या कालावधीसाठी राष्ट्रीय अध्यक्षपदी प्रा. डॉ. राजशरण शाही यांची फेरनिवड, तर डॉ. विरेंद्र सिंह सोलंकी (मध्य प्रदेश) यांची अभाविपचे नवनिर्वाचित राष्ट्रीय महामंत्री म्हणून निवड करण्यात आली आहे. उत्तर प्रदेशातील गोरखपूर येथे २२, २३ आणि २४ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या ७० व्या राष्ट्रीय अधिवेशनात दोन्ही पदाधिकारी पदभार स्वीकारणार आहेत. 'अभाविप'च्या राष्ट्रीय अध्यक्ष आणि राष्ट्रीय महामंत्री पदासाठीची निवडणूक प्रक्रिया गुरुवार, ७ नोव्हेंबर रोजी मुंबईतील केंद्रीय कार्यालयात पार पडली. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी आणि अभाविपच्या राष्ट्रीय कार्यकारी समितीचे विशेष आमंत्रित सदस्य प्रा. डॉ. प्रशांत साठे होते.

# पाण्याच्या टाकीत बुडून मुलाचा मृत्यू

लोकसत्ता प्रतिनिधी

**ठाणे :** कासारवडवली भागातील आनंदनगर परिसरात असलेल्या मतिमंद मुलांच्या संस्थेतील एका मुलाचा पाण्याच्या टाकीत बुडून मृत्यू झाल्याचा प्रकार नुकताच उघडकीस आला आहे.

मुलगा गायब झाल्याचे संस्थेतील कर्मचाऱ्याच्या लक्षात आले. त्या वेळी कर्मचाऱ्याने मुलाचा संस्थेत शोध घेतला. त्याला हा मुलगा संस्थेत असलेल्या भूमिगत पाण्याच्या टाकीत आढळून आला. त्याला जवळच्या खासगी रुग्णालयात नेण्यात आले; परंतु डॉक्टरांनी ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालयात घेऊन जाण्याचा सल्ला दिला. उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

# शहरातील हवा 'अतिवाईट' तर, उपनगरातील 'मध्यम'

## मोसमी पावसाने मुंबईचा निरोप घेताच मुंबईच्या हवेत पुन्हा प्रदूषके

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** वाढत्या प्रदूषणामुळे मुंबईतील हवेची गुणवत्ता गेल्या काही दिवसांपासून वारंवार खालावत चालली आहे. मागील काही दिवस मुंबई आणि उपनगरातील काही भागांत हवा वाईट असल्याची नोंद झाली आहे. मात्र, गुरुवारी शहरातील नेव्ही नगर कुलाबा येथे 'अतिवाईट' हवेची नोंद झाली, तर इतर भागात 'मध्यम' हवा नोंदली गेली. नेव्ही नगर कुलाबा येथील हवा निर्देशांक ३०६ इतका होता.

पावसाळ्यात हवेचा दर्जा काहीसा सुधारला. मात्र, मोसमी पावसाने मुंबईचा निरोप घेताच पुन्हा एकदा मुंबईच्या हवेत प्रदूषके साचून राहू लागली आहेत. समीर ॲपच्या नोंदीनुसार, गुरुवारी नेव्ही नगर कुलाबा येथील हवा 'अतिवाईट' श्रेणीत होती. नेव्ही नगर कुलाबा येथील हवा गुणवत्ता निर्देशांक गुरुवारी ३०६ इतका होता. तर, शिवडी येथे १८१, भायखळा १९९, वांद्रे-कुर्ला संकुल १९३, भांडुप ९७ तर मालाड येथे ८५ इतका हवा निर्देशांक होता.

दरम्यान, मागील काही दिवसांपासून मुंबई आणि उपनगरांतील अनेक भागांत सातत्याने मध्यम ते वाईट हवेची नोंद झाली होती. मात्र, गुरुवारी उपनगरांतील सर्व भागातील हवा निर्देशांक १०० ते १५० दरम्यान होता. याचबरोबर शहरातील नेव्ही नगर कुलाबा हा परिसर सोडला असता निर्देशांक १५० पर्यंत होता. हवा गुणवत्ता निर्देशांकानुसार, हवेतील पीएम २.५ आणि पीएम १० या धूलिकणांचे प्रमाण सातत्याने वाढत आहे. नेव्ही नगर कुलाबा येथे पीएम २.५ कणांची मात्रा अधिक आहे. पीएम २.५ हे अधिक घातक असून ते श्वसन यंत्रणेद्वारे शरीरात जातात, त्याचे हवेतील सामान्य प्रमाण हे ३५ मायक्रो घनाहून जास्त नसावे. किंबहुना, हे कण पीएम १०च्या तुलनेत सूक्ष्म असल्याने सहज शरीरात प्रवेश करतात. त्यामुळे, ते आरोग्यास घातक ठरतात.

पावसाळ्यानंतर मुंबईतील वाऱ्यांची स्थिती बदलते, वेग मंदावतो. त्यामुळे हवेत साचलेली धूळ, प्रदूषके यांचा निचरा होत नाही. बाष्पामुळे धूलिकण हवेत तरंगत राहतात. या कारणांबरोबरच अनेक मानवनिर्मित कारणेही मुंबईच्या प्रदूषणात भर घालत आहेत. पायाभूत सुविधा, रहिवासी व व्यावसायिक संकुले, नवे प्रकल्प यांची बांधकामे मोठ्या प्रमाणावर सुरू आहेत. त्यातून उडणारी धूळ हवेचा दर्जा ढासळण्यास कारणीभूत ठरत आहे.

### उपनगरातील किमान तापमानात घसरण; मुंबईत जैसे थेच

**मुंबई : दिवसा उन्हाचे चटके आणि रात्रीच्या उकाड्याने हैराण झालेल्या उपनगरवासियांना बुधवारी मध्यरात्री तसेच गुरुवारी पहाटे गारव्याने काहीसा दिलासा मिळाला. उपनगरातील किमान तापमानात पहाटेच्या वेळेस घसरण झाल्याने उपनगरवासीयांनी काही काळाकरिता गारवा अनुभवता आला. दुसरीकडे, मुंबई शहरातील किमान तापमान मात्र जैसे थेच होते. दरम्यान, संपूर्ण राज्यात पुढील तीन ते चार दिवस कोरड्या वातावरणासह तापमानात चढ उतार कायम राहण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. या कालावधीत दिवसा उकाडा तर रात्री गारवा अशी स्थिती असू शकते.**

# उमेदवारी अर्ज भरण्याबाबत प्रशिक्षण द्या!

**मुंबई :** निवडणूक लढवण्यास अनेकजण इच्छुक असतात. मात्र, उमेदवारी अर्ज भरताना राहिलेल्या त्रुटींमुळे त्यांचे अर्ज निवडणूक अधिकाऱ्यांकडून फेटाळले जातात. परिणामी, अशा इच्छुक उमेदवारांकडून निवडणूक अधिकाऱ्यांच्या निर्णयाविरोधात न्यायालयात याचिका केल्या जातात. या सगळ्यांचा विचार करता उमेदवारी अर्ज भरण्याबाबत प्रशिक्षण देण्याबाबत विचार करावा, अशी सूचना उच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाला केली आहे.

केंद्रीय निवडणूक आयोगाने (ईसीआय) निवडणुकीसाठीचा नामांकन अर्ज कसा भरावा याबाबत जागरूकता निर्माण करणाऱ्या चित्रफिती तयार करून त्या प्रसिद्ध कराव्यात, अशी सूचनाही न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर आणि न्यायमूर्ती सोमशेखर सुंदरसन यांच्या सुट्टीकालीन खंडपीठाने केली. त्याचवेळी, राज्यातील विविध विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी अर्ज फेटाळलेल्या पाच इच्छुक उमेदवारांच्या याचिका फेटाळून त्यांना दिलासा देण्यास नकार दिला.

याचिकांमध्ये केलेल्या मागणीचा विचार करता आणि नामनिर्देशन अर्ज नाकारण्याचा निवडणूक अधिकाऱ्याचा निर्णय चुकीचा असल्याचे योग्य मानले, तरी निवडणुकीच्या या टप्प्यावर याचिकाकर्त्यांना कोणताही दिलासा दिला जाऊ शकत नाही. असा दिलासा दिल्यास ते निवडणुकीच्या वेळापत्रकात व्यत्यय आणण्यासारखे ठरेल आणि वेळापत्रक विस्कळीत होईल, असे न्यायालयाने म्हटले आहे.


**DELTA CORP LIMITED**

Regd. Off : Delta House, Plot No 12, Hornby Vellard Estate, Dr Annie Besant Road, Worli, Mumbai-400018.
(CIN No.L65493PN1990PLC058817)
Tel No.91-22-69874700, Email ID : secretarial@deltin.com, Website : www.deltacorp.in

**STATEMENT OF CONSOLIDATED UNAUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER AND SIX MONTHS ENDED 30TH SEPTEMBER, 2024**

(Figures are Rupees in Crores unless specified)

| Sr. No. | Particulars | Quarter Ended 30th September, 2024 | Six Months Ended 30th September, 2024 | Quarter Ended 30th September, 2023 |
|---|---|---|---|---|
| | | Unaudited | Unaudited | Unaudited |
| 1 | Total Income from Operations | 187.65 | 368.30 | 261.09 |
| 2 | Net Profit / (Loss) for the period (before Tax, Exceptional and/or Extraordinary items #) | 36.93 | 67.35 | 92.44 |
| 3 | Net Profit / (Loss) for the period before tax (after Exceptional and/or Extraordinary items #) | 36.93 | 68.43 | 92.44 |
| 4 | Net Profit / (Loss) for the period after tax (after Exceptional and/or Extraordinary items#) | 26.98 | 48.66 | 69.44 |
| 5 | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit / (Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | (10.25) | 59.88 | 68.79 |
| 6 | Equity Share Capital | 26.78 | 26.78 | 26.78 |
| 7 | Reserves (excluding Revaluation Reserve) as shown in the Audited Balance Sheet of the previous year | - | - | - |
| 8 | Earnings Per Share (of Rs. 1/- each) (for continuing and discontinued operations) - | | | |
| | Basic : | 1.01 | 1.82 | 2.59 |
| | Diluted : | 1.01 | 1.82 | 2.59 |

The Financial details on standalone basis are as under :

(Figures are Rupees in Crores unless specified)

| | Particulars | Quarter Ended 30th September, 2024 | Six Months Ended 30th September, 2024 | Quarter Ended 30th September, 2023 |
|---|---|---|---|---|
| | | Unaudited | Unaudited | Unaudited |
| | Income from Operations | 145.78 | 288.41 | 176.71 |
| | Profit Before Tax | 58.38 | 111.39 | 85.11 |
| | Profit After Tax | 43.87 | 84.35 | 64.20 |

Note:
a) The above is an extract of the detailed format of Quarterly Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Quarterly Financial Results are available on the websites of BSE AND NSE at www.bseindia.com and www.nseindia.com respectively and on Company's website https://deltacorp.in/pdf/financial/2024-2025/Quarter-September-2024-2025.pdf
b)# - Exceptional and/or Extraordinary items adjusted in the Statement of Profit and Loss in accordance with Ind-AS Rules / AS Rules, whichever is applicable

For Delta Corp Limited
(Jaydev Mody)
Chairman
DIN No.00234797

Place : Mumbai
Date : 6th November, 2024



**TATA**

**TATA STEEL LIMITED**

**Registered Office:** Bombay House, 24, Homi Mody Street, Fort, Mumbai - 400 001 India
Tel.: 91 22 6665 8282 • Fax No.: 91 22 6665 7724 • Email: cosec@tatasteel.com • Website: www.tatasteel.com
CIN: L27100MH1907PLC000260

**सूचना**

**३० सप्टेंबर, २०२४ रोजी संपलेल्या तिमाही/सहा महिन्यांसाठी अलिप्त वित्तीय निष्कर्षांचा उतारा**

₹ कोटी

| तपशील | ३०.०९.२०२४ रोजी संपलेली तिमाही | ३०.०६.२०२४ रोजी संपलेली तिमाही | ३०.०९.२०२३ रोजी संपलेली तिमाही | ३०.०९.२०२४ रोजी संपलेले सहा महिने | ३०.०९.२०२३ रोजी संपलेले सहा महिने | ३१.०३.२०२४ रोजी संपलेले आर्थिक वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| | लेखापरिक्षित | लेखापरिक्षित | लेखापरिक्षित | लेखापरिक्षित | लेखापरिक्षित | लेखापरिक्षित |
| प्रवर्तनातून एकूण महसूल | ३२,३९९.४८ | ३२,९५७.८९ | ३४,१९७.७६ | ६५,३५७.३७ | ६९,७०५.६७ | १,४०,९३२.६५ |
| कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (कर आणि अपवादात्मक बाबींपूर्वी) | ४,७७२.०२ | ४,७०१.८५ | ५,१२८.७६ | ९,४७३.८७ | १०,८१८.४० | २२,९९२.७३ |
| कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक बाबींनंतर) | ४,७८५.८४ | ४,४६५.२८ | (७,८६४.०१) | ९,२५१.१२ | (२,१८५.६१) | ९,३५७.०५ |
| कालावधीसाठी करोत्तर निव्वळ नफा/(तोटा) | ३,५९०.९९ | ३,३३०.९५ | (८,४९०.९६) | ६,९२१.९४ | (३,२७५.५८) | ५,५१४.१९ |
| कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न [कालावधीसाठी नफा/(तोटा) (करोत्तर) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करोत्तर) धरून] | ३,५९८.७८ | ३,४८४.८६ | (८,२९७.९९) | ७,०८३.६४ | (२,९२७.०५) | ६,२०३.७३ |
| भरणा झालेले समभाग भांडवल [दर्शनी मूल्य ₹ १ प्रति भाग] | १,२४८.६० | १,२४८.६० | १,२२२.४० | १,२४८.६० | १,२२२.४० | १,२४८.६० |
| पुनर्मुल्यांकित राखीव वगळून राखीव | | | | | | १,३८,३८०.१७ |
| सिक्युरिटीज प्रिमियम रिझर्व्ह | ३१,२९०.२४ | ३१,२९०.२४ | ३१,२९०.२४ | ३१,२९०.२४ | ३१,२९०.२४ | ३१,२९०.२४ |
| नेट वर्थ | १,३९,०३१.८७ | १,३९,९२५.४९ | १,२७,३३९.८८ | १,३९,०३१.८७ | १,२७,३३९.८८ | १,३६,४४०.८३ |
| भरणा झालेले कर्ज भांडवल | १२,८२४.६९ | १२,८२३.८९ | १०,६२५.८८ | १२,८२४.६९ | १०,६२५.८८ | १२,८२३.१० |
| निव्वळ डेब्ट इक्विटी रेशो | ०.३७ | ०.२७ | ०.३० | ०.३७ | ०.३० | ०.२७ |
| प्रति समभाग प्राप्ती | | | | | | |
| प्रत्येकी ₹ १ ची मूलभूत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर) | २.८८ | २.६७ | (६.८०) | ५.५४ | (२.६२) | ४.४२ |
| प्रत्येकी ₹ १ ची सौम्यिकृत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर) | २.८८ | २.६७ | (६.८०) | ५.५४ | (२.६२) | ४.४२ |
| डिबेंचर विमोचन राखीव | १,३२८.७५ | १,३२८.७५ | १,३२८.७५ | १,३२८.७५ | १,३२८.७५ | १,३२८.७५ |
| डेब्ट सर्व्हिस कव्हरेज रेशो | ३.५१ | ३.१३ | २.५४ | ३.३१ | १.५३ | २.५६ |
| इंटरेस्ट सर्व्हिस कव्हरेज रेशो | १७.४१ | ८.७१ | ८.२० | ११.५४ | ९.३३ | १०.३३ |

**३० सप्टेंबर, २०२४ रोजी संपलेल्या तिमाही/सही महिन्यांसाठी एकत्रित वित्तीय निष्कर्षांचा उतारा**

₹ कोटी

| तपशील | ३०.०९.२०२४ रोजी संपलेली तिमाही | ३०.०६.२०२४ रोजी संपलेली तिमाही | ३०.०९.२०२३ रोजी संपलेली तिमाही | ३०.०९.२०२४ रोजी संपलेले सहा महिने | ३०.०९.२०२३ रोजी संपलेले सहा महिने | ३१.०३.२०२४ रोजी संपलेले आर्थिक वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| | अलेखापरिक्षित | अलेखापरिक्षित | अलेखापरिक्षित | अलेखापरिक्षित | अलेखापरिक्षित | लेखापरिक्षित |
| प्रवर्तनातून एकूण महसूल | ५३,९०४.७१ | ५४,७७१.३९ | ५५,६८१.९३ | १,०८,६७६.१० | १,१५,१७१.५९ | २,२९,१७०.७८ |
| कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (कर आणि अपवादात्मक बाबींपूर्वी) | २,१४६.२४ | २,७३४.७५ | १५९.७१ | ४,८८०.९९ | २,००१.६६ | ६,६६७.०४ |
| कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक बाबींनंतर) | २,१६४.३३ | २,३७६.८२ | (६,७३९.१९) | ४,५४१.१५ | (४,८८३.८२) | (१,१४७.०४) |
| कालावधीसाठी करोत्तर निव्वळ नफा/(तोटा) | ७५८.८४ | ९१८.५७ | (६,५११.१६) | १,६७७.४१ | (५,९८६.३१) | (४,९०९.६१) |
| कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न किालावधीसाठी नफा/ (तोटा) (करोत्तर) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करोत्तर) धरून | १,४९१.२४ | १,०९४.५० | (७,२८५.३५) | २,५८५.७४ | (९,९३३.२१) | (८,१३७.५१) |
| भरणा झालेले समभाग भांडवल [दर्शनी मूल्य ₹ १ प्रति भाग] | १,२४७.४४ | १,२४७.४४ | १,२२१.२४ | १,२४७.४४ | १,२२१.२४ | १,२४७.४४ |
| राखीव (पुनर्मुल्यांकित राखीव वगळून) आणि अनियंत्रक व्याज | | | | | | ९१,१८५.३० |
| नेट वर्थ | ८६,७४७.८७ | ८९,८१५.१० | ८६,५७७.५३ | ८६,७४७.८७ | ८६,५७७.५३ | ८८,६२३.८२ |
| निव्वळ डेब्ट इक्विटी रेशो | ०.९७ | ०.८८ | ०.७९ | ०.९७ | ०.७९ | ०.७८ |
| प्रति समभाग प्राप्ती: | | | | | | |
| प्रत्येकी य १ ची मूलभूत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)- रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर) | ०.६७ | ०.७७ | (५.०७) | १.४४ | (४.५६) | (३.६२) |
| प्रत्येकी य १ ची सौम्यिकृत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)- रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर) | ०.६७ | ०.७७ | (५.०७) | १.४४ | (४.५६) | (३.६२) |
| डिबेंचर विमोचन राखीव | १,३२८.७५ | १,३२८.७५ | १,३२८.७५ | १,३२८.७५ | १,३२८.७५ | १,३२८.७५ |
| डेब्ट सर्व्हिस कव्हरेज रेशो | ०.२९ | १.६४ | ०.२१ | ०.५४ | ०.३२ | ०.६८ |
| इंटरेस्ट सर्व्हिस कव्हरेज रेशो | ३.४० | ३.१९ | १.१२ | ३.२८ | १.९७ | २.४७ |

**टीप :**
सेबी (लिस्टिंग अँड अदर डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ३३ आणि रेग्युलेशन ५२ अंतर्गत स्टॉक एक्स्चेंजेसमध्ये सादर केलेल्या ३० सप्टेंबर, २०२४ रोजी संपलेल्या तिमाही/सहा महिन्यांसाठी अलिप्त आणि एकत्रित वित्तीय निष्कर्षांच्या तपशीलवार विवरणाचा वरील एक उतारा आहे. ३० सप्टेंबर, २०२४ रोजी संपलेल्या तिमाही/सहा महिन्यांसाठी अलिप्त आणि एकत्रित निष्कर्षांचे संपूर्ण विवरण स्टॉक एक्स्चेंजेसच्या वेबसाईटस् (www.nseindia.com / www.bseindia.com) आणि कंपनीची वेबसाईट (www.tatasteel.com) वर उपलब्ध आहे.

**टी व्ही नरेंद्रन**
मुख्य कार्यकारी अधिकारी आणि
व्यवस्थापकीय संचालक
मुंबई : ६ नोव्हेंबर, २०२४

**कौशिक चॅटर्जी**
कार्यकारी संचालक आणि
मुख्य वित्तीय अधिकारी

TATA STEEL